नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक ०९/०३/२०२५ (रविवार) दुपार**

## क्रिकेट सट्टा /बेटिंग वर प्रतिबंध करणे कामी नागपूर ग्रामीण जिल्हा पोलीसांनी ९० संशयीतांना केले स्थानबध्द

मा. श्री हर्ष ए. पोद्दार ,पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण जिल्हा यांची अवैध धंदयावर करडी नजर असुन आज रोजी भारत विरूध्द न्युझीलॅन्ड आयसीसी चॅम्पीयन ट्रॉफी ,अंतीम क्रिकेट सामना असल्याने किक्रेट सट्टा /बेटिंग वर प्रतिबंध होणे कामी मा.पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण जिल्हा यांच्या मार्गदर्शनाखाली नागपूर ग्रामीण पोलीसांनी किक्रेट सट्टा /बेटिंग करणारे **एकुण ९० संशयीत आरोपीतांना स्थानबद्ध करण्यात आले आहे.**

## अवैधरित्या रेतीची चोरटी वाहतुक करणाऱ्या आरोपीतांविरूध्द कारवाई

**पोलीस स्टेशन खापरखेडा** :— दिनांक ०८/०३/२०२५ रोजी खापरखेडा पोलीस हद्दीत पेट्रलिंग करीत असतांना पोलीसांना गुप्त बातमीदारांकडुन खात्रीशीर माहीती मिळाली की, मौजा रोहाणा नदी घाटात ट्रॅक्टर द्वारे अवैधरित्या रेतीचे उत्खनन करून विनापरवाना रेतीची चोरटी वाहतुक होत आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीस रोहणा नदी घाट येथे गेले असता पोलीसांची चाहुल लागताच आरोपी वाहन जागीच सोडुन पळुन गेले. पोलीसांना घटनास्थळावर १) एक निळ्या रंगाचा युरो कंम्पनीचा ट्रॅक्टर क्रमांक एम.पी २२ झेड ए. ८२६० त्याला जोडुन बिना क्रमांकाची ट्रॉली आणि फार्मट्रॅक कम्पनीचा विना क्रमांकाचा ट्रॅक्टर त्याला जोडुन असलेली विना क्रमांकाची ट्रॉली मिळुन आले. सदर वाहनाची तपासणी केली असता दोन्ही वाहनांमध्ये रेती आढळुन आली. पोलीसांनी घटनास्थळावरून पंचासमक्ष **१) दोन वहनांमधील प्रत्येकी १ ब्रास रेती अशी एकुण २ ब्रास रेती** आणि २) दोन वाहने असा **असा एकुण ८,०८,०००/— रूपयाचा मुददेमाल जप्त केला आहे.**

**दोन्ही वाहनाचे चालक आणि मालक यांच्या विरूध्द** पोलीस स्टेशन खापरखेडा येथे कलम,३०३(२), ३(५) भान्यासं सहकलम ४८(७), ४८(८) महाराष्ट्र जमीन महसूल संहिता १९६६, सहकलम ४,२१ खाण आणि खनिज (नियमन आणि विकास) अधि. १९५७,सह कलम ३ सार्वजनिक संपत्ती नुकसान प्रतिबंधक अधिनियम १९८४ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर